



रयत शिक्षण संस्थेचे,

राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज, कोल्हापूर.

मराठी विभाग सन २०२१ -२२

दि.२१ मे २०२२

## 'मराठी विभागाच्या वतीने वालावलकर प्रशालेच्या ग्रंथालयास भेट'

# अहवाल

दि.२१ मे रोजी दिवंगत पंतप्रधान राजीव गांधी यांच्या स्मृतिदिनानिमित्त मराठी विभागाच्या वतीने येथील शा.कृ.पंत वालावलकर या प्रशालेच्या ग्रंथालयास भेट दिली. याभेटीमध्ये मराठी विभागातील विद्यार्थी, प्राध्यापक सहभागी झाले होते. यावेळी विद्यार्थ्यांनी अशा प्रकारचे सुसज्ज ग्रंथालय पाहून ज्ञानात भर पडल्याची भावना व्यक्त केली. याप्रसंगी वालावलकर प्रशालेच्या ग्रंथपाल सौ.मृदुला शिंदे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यातून त्यांनी विद्यार्थ्यांना ग्रंथालयाच्या कामकाजाविषयी माहीती समजावून सांगितली. तसेच ग्रंथालयातील महत्त्वपूर्ण ग्रंथांची विद्यार्थ्यांना ओळख करून दिली. यावेळी मराठी विभागप्रमुख प्रा.डॉ.सिंधू आवळे यांनी महाविद्यालयाच्या वतीने वालावलकर प्रशालेचे व ग्रंथपाल सौ.मृदुला शिंदे यांचे आभार व्यक्त केले. याप्रसंगी मराठी विभागातील प्रा.अंकुश घुले, डॉ.महेश रणदिवे, प्रा.विनोद आखाडे, आदी प्राध्यापक तर अमर मारुती कांबळे, तुषार भरमा मागाडे, महेश अशोक लोखंडे, तानाजी राठोड आदी विध्यार्थी उपस्थित होते. या अभ्यास भेटीसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो.डॉ.व्ही.व्ही.किल्लेदार यांनी मार्गदर्शन केले व प्रोत्साहन दिले.

### परिणाम/निष्पत्ती

- विद्यार्थ्यांना ग्रंथालयीन कामकाजाची माहिती मिळाली.
- विद्यार्थ्यांना लेखन साहित्याविषयी ज्ञान प्राप्त झाले.
- विद्यार्थ्यांना वाचनास व लेखनास प्रेरणा मिळाली.

**लाभार्थी**
**54**







प्रा. डॉ. सिंधू जयवंत आवळे
मराठी, विभाग प्रमुख

प्राचार्य,
राजर्षी छ. शाहू कॉलेज
कोल्हापूर